# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे १) श्री ज्ञानबा राजाराम सोसे, वय ४९ वर्ष, पद पोलीस कॉन्स्टेबल,ब.नं.३८७, वर्ग–३, पो.स्टे.बिबी ता.लोणार जि.बुलढाणा, रा.बालाजी नगर देऊळगाव राजा जि. बुलढाणा, आलोसे २)विजय फकिरा उबाळे, वय ३५ वर्ष,सफाई कामगार (अंशकालीन कर्मचारी)पो.स्टे. बिबी ता. लोणार रा. बिबी ता. लोणार जि.बुलढाणा. |
| लाच मागणी | लाचमागणी ३५०००/– रुपये,तडजोडीअंती ३५००/– रुपये |
| लाचस्विकारले | ३५००/– रुपये |
| घटनास्थळ | ग्राम बिबी येथील सेवालाल चौकातील शिव जेन्टस पार्लर समोर,ता.लोणार जि.बुलढाणा |
| घटनातारीख | २९.१०.२०२३ |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार व त्यांचे आई वडील आणि इतर नातेवाईक यांच्याविरुध्द कलम ४९८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हा हा कोर्ट निकालावर प्रलबिंत आहे. मा.न्यायालयाने तक्रारदार व त्यांचे आई वडील आणि इतर नातेवाईक यांच्याविरुध्द जमानती वारंट काढल्याने पो.स्टे.बिबीचे पोलीस कर्मचारी श्री.सोसे हे तक्रारदार यांना तुम्हाला व तुमच्या आई वडील आणि इतर नातेवाईक यांना अटक न करण्यासाठी ३५०००/– रुपये लाचेची मागणी करित आहेत. अशा आशयाची तक्रार लाप्रवि, बुलढाणा घटकाकडे दिली होती.

त्यानुसार दिनांक २९.१०.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता आलोसे पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानबा सोसे, पो. स्टे. बिबी यांनी तक्रारदार यांचेकडे ३५०००/– रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती ३५००/– रुपये लाचेची मागणी करुन आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे पोलीस कॉन्टेबल श्री. सोसे यांनी लाचेची रक्कम पो.स्टे. बिबीचे सफाई कामगार (अंशकालीन कर्मचारी) विजय उबाळे यांच्या मार्फतीने ३५००/– रुपये लाच रक्कम पंच क्र. १ यांचे समक्ष स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. दोन्ही आलोसे यांना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बिबी येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. मारोती जगताप,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व पो.नि. सचिन इंगळे, पोहेकॉ विलास साखरे, प्रविण बैरागी, नापोकॉ विनोद लोखंडे, जगदीश पवार, पोकॉ गौरव खत्री, शैलेश सोनवणे, मपोकॉ स्वाती वाणी तसेच चालक नापोकॉ नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७०६६४५५तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांनी केले आहे.

(श्रीमती शितल घोगरे)
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा